लोकमत

## मोहन गौतम : 'भाषांचे संगणकीकरण'वर विद्यापीठात राष्ट्रीय चर्चासत्र

# ...तर भारत विश्वगुरू बनेल

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** भारत विभिन्न राज्यांमध्ये विभागला गेला असून, येथे अनेक भाषा, बोली बोलल्या जातात. ही भारतीय भाषांची ताकद असून, जर संपूर्ण देशात एकच अभ्यासक्रम बनविला आणि संबंधित राज्यांसाठी त्याचे भाषांतर केले तर भविष्यात भारत हा सर्व क्षेत्रांत विश्वगुरू बनेल, असे भाकीत युरोपियन विद्यापीठाचे (नेदरलँड) माजी कुलगुरू प्रा. मोहन गौतम यांनी केले.



शिवाजी विद्यापीठात आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात मोहन गौतम यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. पी. एस. पाटील, डॉ. वसंत मोरे, डॉ. पद्मा पाटील, डॉ. देवानंद शिंदे, आदी उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठात हिंदी विभाग आणि पुण्यातील सी-डॅकच्यावतीने 'संगणकाचे भाषाविज्ञान आणि भारतीय भाषांचे संगणकीकरण' या विषयावर आयोजित राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. त्यांनी १० जानेवारी हा विश्व हिंदी दिवस म्हणून साजरा करण्यापेक्षा भारतीय भाषांचा दिवस म्हणून साजरा करण्यास सांगितला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. त्यांनी तंत्रज्ञानामुळे माणसांमधील दुरी कमी होत चालली असून, या तंत्रज्ञानाचा वापर रोजगार निर्मितीसाठी झाला पाहिजे, तरच विद्यापीठ हे समाजात आपले वेगळे स्थान प्राप्त करू शकेल, असे मत डॉ. शिंदे यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमावेळी शारदीय नवरात्रौत्सवानिमित्त महिला प्रतिनिधी म्हणून कुलगुरुंनी संशोधक विद्यार्थिनी सुषमा चौगुले यांचा शाल, शिल्ड देऊन गौरव केला. हिंदी विभागप्रमुख प्रा. डॉ. पद्मा पाटील यांनी प्रास्ताविक केले. यावेळी इतिहासतज्ज्ञ डॉ. वसंत मोरे, माजी हिंदी विभागप्रमुख डॉ. पी. एस. पाटील, ई-लायब्ररीचे संस्थापक नीला श्रीवास्तव, सी-डॅकचे अंकित सहाय, सुनीलकुमार मिश्र, माहेश्वरी, कविता ओझा, रजत गुप्ता, सुप्रिया पाटील (लंडन) यांच्यासह प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यापीठाच्या माजी विद्यार्थ्यांच्या २० रोजी स्नेहमेळावा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठच्या माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहमेळव्याचे आयोजन शनिवार, दि. २० रोजी करण्यात आले आहे. या मेळाव्यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर पूर्वनोंदणी करावी, असे अवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे. माजी विद्यार्थ्यांशी असलेले नाते घट्ट व्हावे यासाठी शिवाजी विद्यापीठातर्फे विशेष प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी अनेक माजी विद्यार्थीही प्रयत्नशील आहेत. मेळावा विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भाषा भवन येथे सकाळी ११.३० वाजता होणार आहे. मेळाव्यामध्ये सहभागी होण्यासाठी विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर नोंदणी करावी, असे अवाहन समन्वयक डॉ. जी. एस. राशीनकर यांनी केले आहे.